# मुख्य वनसंरक्षक, कार्य आयोजना, नागपूर यांचे कार्यालय.

शासकीय मुद्रणालयाजवळ,सिव्हील लाईन्स, नागपूर 01

गोपनीय

विषय : गोंदिया वनविभागातील मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे करण्यात आलेल्या कामाचे तपासणी बाबत.

कमांक : मुवसं / काआना / रेंस / 218 / 2012.13.

नागपूर, दिनांक : **29 / 05 / 2012**

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),

नागपूर.

संदर्भ :–1. या कार्यालयाचे पत्र कमांक काआवि / ना / रेंस / 194 / 12–13 दिनांक 23 / 05 / 2012.

2. उपवनसंरक्षक, गोंदिया यांचे पत्र कमांक कक्ष / व्यय / 798 दिनांक 25 / 05 / 2012 व समकक्ष कमांक 799 दिनांक 25 / 05 / 2012.

या कार्यालयाचे संदर्भीय पत्रान्वये गोंदिया वनविभागात वर्ष 2011–12 मध्ये गोंदिया वनविभागाचे सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव वनपरीक्षेत्रात करण्यात आलेल्या क्षेत्रीय कामांची तपासणी निम्न स्वाक्षरीकर्ते यांनी दिनांक 22 / 05 / 2012 रोजी संबंधीत सहाय्यक वनसंरक्षक वनपरीक्षेत्र अधिकारी, सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव व त्यांचे अधिनस्त क्षेत्रीय कर्मचारी यांचे समवेत केली असता, सदर कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे करण्यात आले नसल्याबाबत तसेच त्यामध्ये गंभीर स्वरूपाच्या वित्तीय व तांत्रीक अनियमीतता आढळून आले असल्याबाबत कळविण्यात आले असता, उपवनसंरक्षक, गोंदिया यांनी त्यांचे संदर्भीय पत्र कमांक 2 अन्वये गोंदिया वनविभागातील विषयांकीत प्रकरणी काम केलेल्या कुपात स्वतः भेट देवून तपासणी न करता सहाय्यक वनसंरक्षक व वनपरीक्षेत्र अधिकारी यांची समिती नियुक्त करून चौकशी करण्याचे सूचित केले आहे. सदर कुपात निम्न स्वाक्षरीकर्ते यांनी स्वतः दिनांक 22 / 05 / 2012 रोजी गोंदिया वनविभागातील संबंधित सर्व सहाय्यक वनसंरक्षक व वनपरीक्षेत्र अधिकारी यांचेसह भेट दिली असता वरील तांत्रीक व वित्तीय अनियमीतता झाली असल्याचे निर्दशनास आल्यानंतर आपलेकडे या कार्यालयाचे संदर्भीय पत्रान्वये आपलेकडे अहवाल पाठविण्यात आला आहे. वास्तविक पाहता विषयांकीत प्रकरणी नैसर्गिक पुर्नउत्पत्ती, सीबीओ, क्लीनिंग व कृत्रीम पुर्नउत्पत्ती चे कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे करण्यात आले नसून सदर कामाकरीता कोणत्याही प्रकारचे उपचार नकाशे तयार करण्यात आले नाही. तसेच वरील कामे मोक्यावर अजिबात करण्यात आले नसून सुध्दा खर्च दाखविण्यात आला आहे. सदर

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुंख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
[illegible]

कामाची तपासणी गोंदिया वनविभागाचे कोणतेही वरीष्ठ अधिकारी यांचेकडून झाले नसून मोजमाप पुस्तिकेवर सुध्दा चुकीचे काम दाखवून शासकीय रकमेचा अपहार करण्यात आल्याचे स्पष्ट दिसून आले आहे.

2.00 अशी गंभीर स्वरूपाची अनियमीतता गोंदिया वनविभागात वर्ष 2011–12 मध्ये मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे उर्वरीत वनपरीक्षेत्रात केलेल्या कामावर झाले असल्याची दाट शक्यता असून त्याची चौकशी आपले स्तरावर होणे आवश्यक आहे. अशी वास्तविक स्थिती असताना उपवनसंरक्षक, गोंदिया यांनी मोक्यावर स्वत: भेट न देता गोंदिया वनविभागातील सहाय्यक वनसंरक्षक व वनपरीक्षेत्र अधिकारी यांची समितीची नेमणुक करून कामाची तपासणी करण्याची सूचना देवून वरील कामावर झालेली अनियमीतता लपविण्याचा प्रयत्न करून त्यांची जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरी या कार्यालयाचे संदर्भीय पत्रान्वये कळविल्याप्रमाणे तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म. रा. नागपूर यांनी त्यांचे गोपनीय पत्र कमांक 25 दिनांक 25/05/2012 अन्वये कळविल्याप्रमाणे सदर कामावर झालेली अनियमीततेची चौकशी करून जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर नियमाप्रमाणे पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

मुख्य वनसंरक्षक,
कार्य आयोजना, नागपूर.

प्रतिलीपी : प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), म. रा. नागपूर यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रतिलीपी : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्यआयोजना–पुर्व), नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर.

प्रतिलीपी : उपवनसंरक्षक, गोंदिया वनविभाग, गोंदिया यांना संदर्भीय पत्राचे अनुषंगाने माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय